# जनसंपर्क अधिकारी


पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-५३ दिनांक - २०/०२/२०२४

## विरार पोलीस ठाणेचे कोंबिग ऑपरेशन दरम्यान ०२ मिसिंग मुलांची सुटका करण्यात विरार पोलीस ठाणेचे पोलीसांना यश.

दि.२०/०२/२०२४ रोजी ००:००वा. ते ०२:००वा.चे दरम्यान श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे यांनी मा.वरिष्ठांचे आदेशान्वये विरार पोलीस ठाणे हद्दीत ठिक-ठिकाणी कोबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन करीता ०५ पोलीस अधिकारी व २५ पोलीस अंमलदार नेमण्यात आले होते. सदर कोबिंग ऑपरेशन कारवाई दरम्यान, हॉटेल, लॉजेस चेक करण्यात आली. पाहिजे व फरारी आरोपीत तसेच हिस्ट्रीशिटर चेक करण्यात आले. बेशिस्त वाहन चालकांवर २८३ भादवि प्रमाणे कारवाई करण्यात आली. अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या ०३ इसमां विरुध्द एन.डी.पी.एस. कायद्यांर्गत कारवाई करण्यात आली. तसेच नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहने व इसमांना चेक करण्यात येवुन, मोटर वाहन कायद्यांर्गत कारवाई करण्यात आली. उशिरा पर्यंत आस्थापना चालु ठेवणाऱ्या आस्थापना चालकांवर मु.पो.का.क.३३/१३१ प्रमाणे कारवाई करण्यात आल्या आहेत.

सदरचे कोबिंग ऑपरेशन कारवाई चालु असतांना, एक २६ वर्षीय तरुण संशयास्पद रित्या वावरत असतांना, तो पोलीसांना पाहुन पळुन जावु लागला असता, त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, सदरचा तरुण हा सुरत येथुन दि.१५/०२/२०२४ पासुन मिसिंग असुन, त्याबाबत गोदादरा पो.ठाणे, सुरत शहर, राज्य-गुजरात येथे मिसिंग क्रं.१५/२०२४ अन्वये मिसिंग दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे नमुद तरुणाचे पालकांना विरार पोलीसांनी संपर्क साधुन खात्री केली असता, त्यांनी सदरचा त्यांचा मुलगा असल्याचे कळवुन, त्यांनी पोलीसांचे सदर कारवाईवर संतुष्ट होवुन, त्यांनी पोलीसांचे मनापासुन आभार मानले आहेत.

त्याचप्रमाणे सदरचे कोबिंग ऑपरेशन कारवाई पुर्ण करुन, पोलीस उप निरीक्षक/भाऊसाहेब डुबे हे त्यांचे राहते घरी जात असतांना, त्यांना रेल्वेमध्ये एक तरुण व तरुणी रेल्वेमध्ये संशयास्पद वाटल्याने, त्यांनी नमुद तरुण व तरुणीकडे चौकशी केली असता, त्या तरुणीने तीचे सोबत असलेल्या मुलाने तीस सुरत येथुन पळवुन आणले असल्याचे कळविले. सदरची बाब गंभीर स्वरुपाची असल्याने, पोउपनि/डुबे यांनी लागलीच नमुद त्या तरुण व तरुणीस जवळच्या नयानगर पोलीस ठाणे येथे घेवुन जावुन तेथील पोलीसांचे ताब्यात दिले. सदर बाबत माहिती घेतली असता, नमुद अपहृरीत मुलीचे अपहारणा बाबत कापुदरा पोलीस ठाणे, सुरत शहर, राज्य-गुजरात येथे गु.रजि.नं. ११२१००२२२४०३४४/२०२४, भा.दं.वि.सं.कलम-३६३ प्रमाणे गुन्हा नोंद असल्याचे समजल्याने, त्या बाबत सुरत पोलीसांना माहिती देण्यात आली आहे.

कोबिंग ऑपरेशन कारवाई दरम्यान मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे पोलीसांनी एक मिसिंग मुलाचा व एका अपहृरीत मुलीचा शोध घेवुन, त्यांस त्यांचे पालकांचे ताब्यात देवुन, दोन कुटूंबाचे समाधान केले असुन, त्यांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले आहेत.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व विरार पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

-----ooo-----